

# पालि-सुगंधावली

## इयत्ता दहावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्‌दल दयाबुद्‌धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# पालि - सुगंधावली

पालि - संपूर्ण आणि संयुक्त अभ्यासक्रमासाठी

## इयत्ता दहावी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ४११ ००४

प्रथमावृत्ती : २०१३
पुनर्मुद्रण – २०२१

© महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–४११ ००४.
यांनी सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४११ ००४ यांच्या लेखी परवानगीशिवाय मुद्रण किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे. तसेच सी. डी., दृक्श्राव्य फिती, छायांकित प्रती किंवा अशा प्रकारची माहिती साठवून ठेवणाऱ्या, विजेवर चालणाऱ्या कोणत्याही यंत्राचा अथवा यांत्रिक संदेशवहन पद्धतीचा वापर करता येणार नाही.

प्रस्तुत पुस्तक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या धोरणानुसार पालि अभ्यास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संपादक मंडळाने तयार केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| **पालि अभ्यास मंडळ सदस्य** | : | प्रा. डॉ. ज्योत्स्ना खरे (निमंत्रक)<br>प्रा. माधव मेश्राम (समन्वयक)<br>प्रा. रामकृष्ण तागडे (विषय तज्ञ)<br>प्रा. अशोक पैठणे (सदस्य)<br>प्रा. अरूणा पाटील (सदस्या)<br>डॉ. एल.जी. मेश्राम 'विमलकिर्ती' (सदस्य)<br>डॉ. सुभाष आठवले (सदस्य) |
| **संपादक मंडळ सदस्य** | : | डॉ. विश्वनाथ चौरपगार<br>प्रा. मोहन वानखडे<br>श्री. पंजाब प्रधान<br>डॉ. मनिष आनंद |
| **समन्वयक** | : | प्रा. माधव मेश्राम |
| **कार्यालयीन समन्वयक** | : | श्री. गोवर्धन सोनवणे. |
| **प्रकाशक** | : | श्री. कृष्णकुमार पाटील<br>सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–४११ ००४. |
| **छपाई व वितरण** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे–४११ ००४. |
| **अक्षरजुळणी** | : | ट्रेन्झ, मुंबई |
| **निर्मिती** | : | श्री विवेक गोसावी, नियंत्रक<br>श्री सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>श्री राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी<br>श्री राजेंद्र पांडलोसकर, सहाय्यक निर्मिती अधिकारी |
| **मुखपृष्ठ व सजावट** | : | श्री. घनश्याम देशमुख |
| **कागद** | : | ७० जी.एस.एम.क्रीम वोव्ह |
| **मुद्रक** | : | |
| **मुद्रणादेश** | : | |

# “भारतस्स संविधान”

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**

**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स

च तस्स सब्बे नागरिकानं;

**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक ञाय;**

**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**

**च उपासना एस्स विमुत्ति;**

**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**

**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**

**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**

**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**

**एस्स आन दातु बन्धूता**

पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;

**अम्हाकं संविधान सभास्मिं**

अज्ज दिवांङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने

इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**

कत्वान **सयं पत समप्पयाम.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

# पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळ्हपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो–अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळ्हभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ''राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५'' व 'राज्य अभ्यासक्रम आराखडा – २०१०' यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार इयत्ता १० वी/१२ वी पालि भाषेच्या पाठ्यपुस्तकाची पुनर्रचना व निर्मिती करण्यात आली आहे.

ह्या पाठ्यपुस्तकातील भाग–१ पालि–संपूर्ण साठी असून भाग–२ पालि–संयुक्तसाठी आहे.

पालि भाषेचे तात्त्विक, वाङमयीन, भाषिक वैशिष्ट्ये व महत्व विशद करणारे घटक या पाठ्य–पुस्तकात समाविष्ट केले आहेत, त्यासाठी पालि तिपिटक, अनुपिटक ग्रंथ, वंस साहित्य, जातककथा, अट्ठकथा साहित्य, सुभाषित, काव्य इत्यादिचा वापर करण्यांत आला आहे.

पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार इयत्ता दहावी व बारावीचे पालि विषयाचे पाठ्यपुस्तक द्वितीय भाषा या स्तरावर वैकल्पिक भाषा म्हणुन तयार केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचा वयोगट, त्याची आकलन क्षमता लक्षात घेवुन गद्य व पद्य पाठाची निवड करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पर्यावरण या विषयाचा पाठ्यपुस्तकात १० टक्के समावेश करण्यात आला आहे. पाठ्यघटकाच्या संहितेत आवश्यक तेथे काही बदल केले आहेत. संहिता लिहितांना लेखनपध्दती व विद्यमान संकेताचा स्वीकार करून एकसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे. पाठ निवडतांना काही चिरंतन मुल्ये आणि तत्वांचा विचार मनात ठेवलेला आहे.

पालि भाषा हे बौध्द तत्वज्ञान विशद करणारे प्रभावी व प्राचीन माध्यम आहे. सर्वप्रथम तथागत बुध्दाने सर्वसामान्य जनतेच्या भाषेचा धम्मप्रचार व प्रसारासाठी आग्रह व कटाक्ष पूर्ण वापर केला आहे. बुध्दाने भिक्खूसंघाला लोकभाषेतच आपले सर्व धम्मप्रसार, प्रचार व उपदेशाचे कार्य करण्याची संमती दिली होती. कालांतराने या भाषेला ''पालि'' या नावाने संबोधले गेले. पालि साहित्यांत समता, विचार–स्वातंत्र्य, बंधुता, परमसहिष्णुता, बुद्धिवाद, अहिंसा, लोकशाही, मानवता, नैतिकता आणि समाजवादाला पोषक विचार या विविध उदात्त तत्वमुल्यांचा समावेश होतो. वर्णभेद व जातिभेदाचे खंडण करणारे सुत्त सर्वत्र विखुरली आहेत.

तथागत बुध्दाने भिक्खूंना व्यक्तिगत संपत्ती ठेवण्याचा हक्क नाकारला, भिक्खूसंघाची संपूर्ण कार्यप्रणाली लोकशाही स्वरूपाची ठेवली. विभिन्न भाषा, प्रांत, विविध कुळातुन आलेले लोक भिक्खूसंघात एकदिलाने व प्रेमाने एकत्र राहत असत, हे दृश्य राष्ट्रीय एकात्मतेची भावना मजबुत करणारे आहे.

बुध्दाने नेहमी स्त्री–पुरूष समतेचा पुरस्कार केला आहे, शिवाय त्यांनी स्त्रीयांचा ''मातुगाम''या शब्दाने गौरव केलेला आहे. 'थेरीगाथा' हा ग्रंथ भिक्खूणींच्या योग्यतेचा आरसा वाटतो.

कुठलीही समस्या अहिंसा व प्रेमाने सुटू शकते हा अतिप्राचीन धम्म असल्याची ग्वाही देवुन युद्ध भयाने ग्रस्त विश्वाला शांतीचा संदेश दिला. बुध्दाची अहिंसा शूराची वृत्ती आहे. भारतीय व परदेशातील कला व संस्कृतीवर पालि साहित्याचा कायम ठसा उमटलेला आहे. सर्वत्र चित्रकला, मुर्तिकला, वास्तुकला व शिल्पकलेवर पालि साहित्याच्या प्रभावाच्या खुणा स्पष्ट दिसतात. श्रीलंका, म्यामार, थायलंड, कंबोडिया, लाओस, मंगोलिया, व्हिएतनाम, चीन, जपान, कोरिया, नेपाळ, बांगलादेश, तिबेट इत्यादि अनेक देश या सत्याची ग्वाही देतात.

अजिंठा, वेरूळ, सांची, भरहूत, नागार्जुनकोंडा, अमरावती, सारनाथ, बुध्दगया ही भारतीय स्थाने या साहित्याच्या प्रभावाची व बौध्द कलेची स्मारकेच ठरली आहेत. तसेच विश्वातील कथा साहित्यावर पालि जातकांचा प्रभाव आढळून येतो, हे सर्व अभ्यासक मान्य करतात.

उपरोक्त, उदात्त तत्त्वगुणांचा समावेश पालि साहित्यांत होतो. संस्कारक्षम विद्यार्थ्यांच्या मनावर याचा पोषक परिणाम होवून उत्तम चरित्र घडण होण्यास याची मदत होवु शकेल. विद्यार्थ्यांना योग्य व दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत म्हणुन मंडळाने हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालि भाषेच्या अध्ययनाची, गोडी व आवड वाढवायला याची मदत व्हावी अशी आशा आहे.

पालि मंडळाचे निमंत्रक आणि सभासद, संपादक समीक्षक व इतर सर्वांनी आपलेपणाच्या भावनेने परिश्रम घेवून हे पाठ्यपुस्तक तयार करण्याकरिता मंडळाला जे अमोल सहकार्य दिले त्याबद्दल हे मंडळ सर्वाचे कृतज्ञतापूर्वक आभारी आहे.

पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे संपादक यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व मंडळाचे निमंत्रक यांनी हे पुस्तक सुबक व आकर्षक स्वरूपात वेळेवर उपलब्ध करून दिल्याबद्दल यांना मनापासून धन्यवाद !

सही

**(सर्जेराव जाधव)**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च

माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

पुणे

दिनांक : १/२/२०१३

# पालिभाषेचे महत्त्व

पालिभाषा ही भारतातील एक प्राचीन भाषा आहे. या भाषेमध्ये तथागत बुध्दाचे मूळ तत्वज्ञान संग्रहीत आहे. तथागत बुध्दाने आपला संपूर्ण धम्मोपदेश पालिभाषेमध्येच दिलेला होता. ही पालि भाषा तथागत बुध्दाच्या आधीपासून मगध देशामध्ये व मगध देशाला लागून असलेल्या अनेक जनपदांची लोकभाषा होती. परंतु या भाषेचे प्रमुख केंद्र 'मगध' देश असल्यामुळे या भाषेला 'मागधी' म्हटले जात होते. मागधी याचा अर्थ मगध देशामधील लोकांची भाषा होय. मगध देश म्हणजे आजच्या बिहार राज्यातील एक अतिशय महत्वाचा भूभाग होय. या मागधी प्रदेशाला, भूभागाला प्राचीन भारतीय इतिहासामध्ये अतिशय महत्वाचे स्थान होते व आज सुध्दा आहे, मगध प्रांत हा बुध्द धम्माच्या उदयाचा, बौद्ध संस्कृतीच्या उदयाचा, लोकशाहीवादी समाजव्यवस्थेच्या उदयाचा, लोकशाहीवादी जीवन मूल्यांच्या उदयाचा व संवर्धनाचा प्रदेश होता. या मगध प्रांतामध्ये तथागत बुध्दाने अनेकदा चारिका केलेली होती, वर्षावास केलेले होते, त्याचप्रमाणे तथागत बुध्दाने वैशालीच्या वज्जिंच्या लोकशाहीवादी जीवन प्रणालीचे अतिशय उदारपणाने समर्थन करून प्रशंसा केलेली होती. या संबंधीची संपूर्ण माहिती पालितिपिटकामध्ये उपलब्ध आहे.

पालितिपिटक म्हणजे तथागत बुध्दाच्या मूळ उपदेशाचा संग्रह असून तो पालिमध्ये आहे. पालितिपिटकाला बुध्दवचन असेही संबोधले जाते. पालिभाषेचे मूळ नाव 'मागधी' असून नंतर 'पालि' अट्ठकथाकारांनी या मागधी भाषेला 'पालि' या नावाने संबोधलेले आहे. 'पालि' याचा अर्थ असाही केला जातो की 'पालेन्ती ति इति पालि' म्हणजेच जी सर्व सामान्य लोकांचे पालन करते, संरक्षण करते ती भाषा म्हणजेच पालि होय. 'पालि' शब्दाची निर्मिती कशी झाली या बद्दल वेगवेगळ्या विद्वानांच्या, भाषाशास्त्रज्ञांच्या, पालिभाषेच्या अभ्यासकांच्या वेगवेगळ्या मान्यता आहेत. काहींच्या मते 'पल्लि' शब्दापासून 'पालि' शब्दाची निर्मिती झाली अशी मान्यता आहे. 'पल्लि' म्हणजे गाव. अर्थात गावच्या लोकांची भाषा म्हणजेच पालि होय. काही विद्वानाच्या मते 'पंक्ति' या शब्दापासून 'पालि' शब्दाची निर्मिती झाली, असेही मानले जाते.

'पंक्ति' म्हणजे ओळ, पंगत असा होतो. म्हणजेच पालि भाषा एखाद्या पंक्ति, ओळीप्रमाणे सुव्यवस्थित, सूत्रबद्ध, सरळ व सोपी आहे. त्याचप्रमाणे पालिमधील बुध्दवचन अतिशय सूत्रबद्ध, सरळ, सोपे व व्यवस्थित आहेत म्हणूनच या गुणवैशिष्ट्यामुळे मागधी भाषेला पालि अट्ठकथाकारांनी 'पालि' या नावाने संबोधलेले आहे. अशा प्रकारे पालि भाषेमधील भाषिक गुणवैशिष्ट्यामुळे व बुद्धवचनांच्या सुसुत्रबद्धतेमुळेच मागधी भाषेला पालि या नावाने संबोधले गेलेले आहे. या पालि भाषेमध्ये विशाल असे साहित्य आहे. तिपिटक साहित्य आहे, अनुपिटक साहित्य आहे, अट्ठकथा साहित्य आहे, वंससाहित्य आहे. त्याचप्रमाणे या पालि साहित्यामध्ये साहित्याचे (वाङ्मयाचे) जवळ–जवळ सर्वच प्रकार आढळून येतात. यात पालिगद्य साहित्य आहे, पालिकाव्य (पद्य) साहित्य आहे, कथा साहित्य आहे. त्यात लघुकथा, दीर्घकथा साहित्य आहे, संवाद साहित्य आहे, वृत्तान्त पध्दतीचे साहित्य आहे, उदान आहे, इतिवुत्तक साहित्य आहे, इत्यादी साहित्याचे अनेक प्रकार आहेत. तथागत बुद्धाने आपली शिकवण लोक भाषेत सांगून पालिभाषेला एक विश्वभाषा म्हणून दर्जा प्राप्त करून दिला. कारण पालि भाषा ही मूळची प्राचीन भारतीय भाषा आहे. पालि भाषा तथागताच्या पूर्वी दैनंदिन जीवनात बोलली जाणारी लोकभाषा होती. तत्त्कालीन लोकांच्या दैनंदिन व्यवहारिक भाषेत त्यांनी धम्माची शिकवण दिली. त्यामुळे लोकांना त्याचे अधिक चांगले आकलन झाले. सम्राट अशोकाच्या काळात (इ.स.पुर्व २७०–२३३) काबुल, गांधार, कंदहार, अफगाणिस्थान, बलुचिस्थान, मकरान इत्यादी भूप्रदेशातील सर्व नागरिक बौद्ध अनुयायी होते.

पालिभाषा ही प्राचीन भारतीय भाषा असली तरीही या भाषेमध्ये सिंहल, म्यॉंमार, थाईलंड इत्यादी देशामध्ये पालि ग्रंथ रचना करण्यात आलेली आहे व आज सुध्दा भारताच्या दक्षिण–पूर्व देशात पालि भाषेमध्ये साहित्य निर्मिती, ग्रंथरचना केली जात आहे. पालि भाषेमध्ये काव्य रचना केली जात आहे. त्याचप्रमाणे तात्त्विक व वैचारिक ग्रंथांचे लेखन पालिमध्ये केले जाते आहे. या दृष्टीने धम्मानंद कोसम्बी, डॉ. भरतसिंह उपाध्याय, भिक्खू जगदीस कस्सप यांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. सिंहलमध्ये व म्यॉंमारमध्ये पालिग्रंथ लेखन करण्याची आजही फार मोठी परंपरा आहे. आज भारतामध्ये फार मोठ्याप्रमाणात वेगवेगळ्या स्तरावर पालिभाषेचे अध्यापन व अध्ययन कार्य होत आहे.

पालिभाषेचा प्रभाव भारताच्या मध्यकाळातील अपभ्रंश इत्यादी भाषावर आढळून येतो. त्याचप्रमाणे आधुनिक भारतातील जवळ–जवळ सर्वच लोकभाषांवर पालिभाषेचा प्रभाव आढळून येतो. आधुनिक भारतातील अनेक लोकभाषामध्ये अर्थात मराठी, हिंदी, पंजाबी, बंगाली, गुजराथी, भोजपुरी, मैथिली, अवधी, कोरकू इत्यादींवर पालि भाषेचा प्रभाव व त्यांचा पालिशी संबंध आढळून येतो. दक्षिणभारतातील अनेक लोकभाषावर, सर्वसामान्य लोकांच्या भाषा व बोलीवर पालिभाषेचा प्रभाव आढळून येतो. भारतातील सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील बोली–भाषेशी पालिभाषा ही अधिक जवळीक ठेवणारी भाषा आहे. सिंहली भाषा, म्यॉंमार, थाईलंडमधील इतर भाषा व बोली मध्ये सुध्दा पालिभाषेचा प्रभाव निश्चितपणे आढळून येतो. कारण ज्या ज्या देशामध्ये बुध्दाचा धम्म गेलेला आहे, तेथे तेथे पालिभाषासुद्धा गेलेली आहे. पालिभाषेने जगातील लोकभाषांचे महत्त्व स्थापित केलेले आहे.

पालि भाषा शिकण्याच्या दृष्टीने व समजण्याच्या दृष्टीने अतिशय सोपी आहे.कारण या भाषेमध्ये अक्षरांची (वर्ण) संख्या एकेचाळीस आहे. त्यात तेहतीस व्यंजन व आठ स्वर आहेत. त्याचप्रमाणे पालिमध्ये एकवचन व बहुवचन आहे. त्यामुळेच ही भाषा व्याकरणदृष्ट्या शिकण्याकरीता सोपी आहे. या भाषेमध्ये व्याकरण सूत्रांची संख्या सुद्धा सातशे/आठशे पेक्षा जास्त नाही. म्हणूनच आधुनिक भाषाशास्त्राच्या दृष्टीने सुध्दा या भाषेला फार महत्व आहे. पालिभाषेचे व्याकरण पालिमध्येच आहे व पालि साहित्याचे अलंकारशास्त्रसुद्धा पालिमध्येच आहे. सर्वसाधारण पालिव्याकरणाच्या अभ्यासाने सुध्दा पालिभाषेला समजून घेता येते व पालि साहित्याचे अध्ययन करता येते. पालिभाषेची स्वतंत्र व्याकरण परंपरा आहे. अशा अनेक दृष्टिने प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत व संपूर्ण बौध्दसंस्कृती, बौध्दतत्वज्ञान, बौध्द इतिहास, बौध्द जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टीने, जाणून घेण्याच्या दृष्टिने पालिभाषेला फार महत्त्व आहे. प्राचीन भारताचा इतिहास, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, भूगोल, ज्ञान-विज्ञान, सांस्कृतिक देवान-घेवान इत्यादींना समजून घेण्याकरीता सुध्दा पालिभाषेच्या अध्ययनाचे महत्त्व आहे. सम्राट अशोकाच्या शिलालेखांचे महत्व व स्वरूप समजून घेण्याकरीता पालिभाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. अशा अनेक दृष्टिने पालि भाषेच्या अध्ययनाचे महत्त्व लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने आपल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक अभ्यासक्रमामध्ये पालिभाषेच्या अध्ययनाला समाविष्ट केले ही बाब अतिशय महत्त्वाची आहे.

पालिभाषेची जन्मभूमि असलेल्या मध्यकालीन भारतामध्ये पालिभाषेचे अध्ययन, अध्यापन, विलुप्त झालेले होते. परंतु आधुनिक भारतामध्ये बौध्द धम्माच्या पुनर्स्थापनेबरोबरच पालिभाषेच्या अध्ययन-अध्यापनाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. या घटनेला वर्ष २०१२ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होत आहे. म्हणजेच हे वर्ष आधुनिक भारतामध्ये महाराष्ट्रात पालि भाषेच्या अध्यपनाचे शताद्बी वर्ष आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. असे म्हणता येईल.

पालि भाषा ही प्राचीन भारतीय भाषा असून ती एक अभिजात भाषा आहे. कारण या भाषेमध्ये अतिशय महत्त्वाचे साहित्य आहे. त्यामुळे या भाषेच्या अध्ययन व अध्यापकाला महत्त्व तर आहेच, शिवाय नौकरी व व्यक्तिगत प्रतिभा वाढविण्याच्या दृष्टिनेही या भाषेच्या अध्ययनाला महत्त्व आहे. आज जगामध्ये सर्वत्र या भाषेचे वेगवेगळ्या दृष्टिने अध्ययन होत असल्यामुळे या भाषेच्या अध्ययनाने बऱ्याच प्रमाणात नोकऱ्यांची संधी सुध्दा निर्माण झालेली आहे. तसेच मानवी बंधनाना झुगारून समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही मुल्ये जोपासण्याचे महान कार्य पालि भाषेने केले आहे. यामुळे पालिभाषेचा अभ्यास करण्याऱ्या वाचकाला त्याच्या कल्याणाची व जीवन जगण्याची उत्तम संहिता बनते. पालि भाषेच्या अध्यायनामुळे ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' ही राष्ट्रभावना वृद्धींगत होते. मानव सर्व प्रकारच्या बंधनापासून मुक्त होतो. तो विकार मुक्त होतो. हेच या पालि साहित्याचे वैशिष्ट्य आहे म्हणून आजच्या विज्ञान युगात, सर्व क्षेत्रात या साहित्याचे अध्ययन-अध्यापन होणे अगत्याचे आहे.

ब)

**तिपिटक**

- विनयपिटक
- सुत्तपिटक
- अभिधम्मपिटक

१) **विनयपिटक**

- सुत्तविभंग
  - पाराजिक
  - पाचित्तिय
- खन्धक
  - महावग्ग
  - चुल्लवग्ग
- परिवार

२) **सुत्तपिटक**

- १ दीघनिकाय
- २ मज्झिमनिकाय
- ३ संयुत्तनिकाय
- ४ अङ्गुत्तरनिकाय
- ५ खुद्दकनिकाय

**खुद्दकनिकायाचे भाग**

१) खुद्दकपाठ, २) धम्मपद, ३) उदान, ४) इतिवुत्तक, ५) सुत्तनिपात, ६) विमानवत्थु, ७) पेतवत्थु, ८) थेरगाथा, ९) थेरीगाथा, १०) जातक, ११) निद्देस, १२) पटिसम्भिदामग्ग, १३) अपदान, १४) बुध्दवंस, १५) चरियापिटक

३) **अभिधम्मपिटक**

- धम्मसंगणि
- विभंग
- धातुकथा
- पुग्गलपञ्ञति
- कथावत्थु
- यमक
- पट्ठान

# पाठानुक्कमो

## गज्जो विभागो

भाग-१ (पालि-संपूर्ण)


| अ.क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १. | दस उपासकगुणा | १ |
| २. | दन्तकट्ठं | ३ |
| ३. | तनया सुखं ददाति | ४ |
| ४. | पच्चुपकारकथा | ५ |
| ५. | बोधिकथा | ७ |
| ६. | इत्थि पण्डिता होति | १० |
| ७. | कलहो हि विनासमुलो | १३ |
| ८. | उच्छङ्गजातकवण्णना | १६ |
| ९. | चीन देसिय पवासि-युवानच्वांग | १८ |
| १०. | ततिय संगीति कथासंक्खेपो | २० |
| ११. | राजसिरि साहुछत्तपति महाराजा | २२ |


## पज्जो विभागो


| | | |
|---|---|---|
| १. | जटासुत्तं | २४ |
| २. | पटाचारा थेरीगाथा | २६ |
| ३. | को धम्मसारी ? | २८ |
| ४. | धम्मपदं (पाठांतरासाठी) | ३० |
| ५. | सीलवत्थेरगाथा | ३२ |
| ६. | इतिवुत्तकं | ३४ |
| ७. | वट्टपोतक-चरियं | ३६ |
| ८. | गोतम चरियं | ३९ |


## थुलवाचनं


| | | |
|---|---|---|
| १. | पञ्चभेसज्जकथा | ४१ |
| २. | पुण्णिका थेरी | ४३ |


## परिशिष्ट /परिसिट्ठ


१. (अ) पालि निबंधाचे विषय, (ब) टीपा.

२. व्याकरण (१) नामरूपावली, (२) धातुरूपावली, (३) सन्धी, (४) समास, (५) विशेषण व अव्यये.

३. तोंडी परीक्षा आणि प्रश्नपत्रिकेचा आराखडा.

**इयत्ता – दहावी**

**विषय – पालि (संयुक्त)**

## पाठानुक्कमो

### गज्जपाठो

**भाग – २ (पालि – संयुक्त)**


१. सिप्प सुत्तं ........ ६६
२. कुम्भकार कथा ........ ६७
३. सीलविमंसनं ........ ६९
४. राहुल वत्थु ........ ७१
५. सुपत्तिट्ठितो भिक्खूणी संघो ........ ७३
६. द्वे पिण्डपाता समसमफला ........ ७५
७. बाबासाहेबो आंबेडकरो ........ ७८


### पज्जपाठो


१. उत्तरा थेरी ........ ८१
२. सुभासितमाला ........ ८३
३. मेत्तसुत्तं ........ ८६


### परिसिट्ठ


१. व्याकरण (पालि – संपूर्णचे व्याकरण पालि – संयुक्तसाठी देखील आहे).
२. टीपा.
३. तोंडी परीक्षा व प्रश्नपत्रिका आराखडा.